पान १ वरून

ज्येष्ठ नेते मधुकरराव पिचड यांचे निधन

मधुकरराव पिचड यांच्या पश्चात पत्नी माजी सरपंच हेमलता पिचड, दोन मुले हेमंत व माजी आमदार वैभव पिचड, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना मधुकरराव पिचड यांनी राजकीय आणि सामाजिक जीवनात जे यश मिळविले ते थक्क करणारे आहे. हे यश त्यांनी स्वकर्तृत्वावर मिळविले. त्यांचा जन्म १ जून १९४१ रोजी झाला. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. पुणे येथील प्रसिद्ध फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. याठिकाणी प्रसिद्ध समाजवादी विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान हे त्यांचे शिक्षक होते. पदवी प्राप्त करून गावी परतल्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून आपल्या कामास सुरुवात केली. १९७२ ला ते प्रथम जिल्हा परिषद सदस्य बनले. १९७२ ते १९८० याकाळात ते अकोले पंचायत समितीचे सभापती होते. सभापती असताना १९७२ च्या दुष्काळात प्रभावीपणे काम केले. १९८० मध्ये प्रथमच ते अकोले विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून गेले. आमदार झाल्यानंतर राजकीय जीवनात मागे वळून पाहिलेच नाही. सलग सातवेळा आमदार, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, विधानसभा विरोधी पक्षनेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशा यशाच्या एकेक पायऱ्या ते चढत गेले. अकोले तालुका विकासात मधुकरराव पिचड यांचे महत्वाचे योगदान आहे. त्यांचा राजकीय प्रवास आधी काँग्रेस नंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यानंतर भाजप असा राहिला आहे. ते राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून शरद पवार यांच्यासोबत होते, २०१४ ला त्यांनी अकोले मतदार संघात पुत्र वैभव पिचड यांना राष्ट्रवादीकडून निवडून आणले. २०१९ ला पिचड यांनी भाजपात प्रवेश केला. मधुकर पिचड यांनी १९६१ मध्ये अमृत सागर दूध सहकारी संस्था तर १९९३ मध्ये अगस्ती सहकारी साखर कारखाना स्थापन केला.

लढवय्या पर्वाचा अस्त!

डोंगरदऱ्यात वीज पोहचविली. प्रत्येक खेडेगाव रस्त्याने जोडले. नवीन घाट रस्त्याची निर्मिती केली. पाणी, वीज, रस्ते यामुळे शेती क्षेत्राला उर्जितावस्था आली.

भंडारदरा धरणाच्या पाण्यात अकोले तालुक्याला हक्क मिळावा म्हणून तालुक्यात मोठी चळवळ उभी राहिली होती. सत्ताधारी पक्षाचे आमदार असूनही मधुकरराव पिचड या चळवळीत सहभागी झाले. भंडारदरा धरणाच्या पाण्याचे फेरवाटप होऊन अकोले तालुक्याला हक्काचे पाणी मिळाले त्यात त्यांचा मोठा वाटा आहे. जिल्ह्याच्यादृष्टीने महत्वपूर्ण असणाऱ्या निळवंडे धरणाच्या निर्मितीतही त्यांचे फार मोठे योगदान आहे. निळवंडे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा उपयोग करून सोडविले. या पुनर्वसनासाठी सरकारने अनेक खास बाबींना मंजुरी दिली ती त्यांच्यामुळेच. निळवंडे पुनर्वसनाचा हा पिचड पॅटर्न राज्यभर गाजला. केवळ अकोले तालुक्यासाठी निळवंडे धरणासाठी काढलेले उच्चस्तरीय कालवे तसेच निळवंडे जलाशयातील उड्डाणपूल हे केवळ त्यांच्यामुळेच प्रत्यक्षात आले.

१९९३ मध्ये अगस्ति सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर अवघ्या नऊ महिन्यांत साखर कारखान्याची निर्मिती त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात झाली. २८ वर्षे या कारखान्याच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळली. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कारखाना बंद पडू दिला नाही. त्यांच्या कार्यकाळात अकोले तालुक्यात शिक्षण, आरोग्य, दळणवळण, शेती या सर्वच क्षेत्रात मोठे काम झाले. मुळा, प्रवरा, आढळा या नद्यांसह लहान-मोठ्या ओढ्यांवर पूल उभे राहिले, नवीन घाट रस्ते तयार झाले. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात आश्रमशाळा सुरू झाल्या, वसतिगृहे सुरू करण्यात आली. तालुकाभर आरोग्य यंत्रणेला बळकटी देण्याचे काम करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये तयार झाली. आशिया खंडातील सर्वात मोठा असणारा घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, कोदणी व भंडारदरा जलविद्युत प्रकल्प, खिरविरे व पाचपट्टा पवन ऊर्जा प्रकल्प यांसारखे वीज प्रकल्पही त्यांच्याच मंत्रीपदाच्या काळात उभे राहिले.

आदिवासी विकास मंत्री म्हणून आदिवासी समाजासाठी त्यांनी खूप काही केले. राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासी समाजासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्यास त्यांच्याच काळात सुरुवात झाली. तसेच पेसा कायद्याची अंमबजावणी त्यांनी सुरू केली. त्यामुळे पेसा क्षेत्रात नोकरीच्या जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव झाल्या. आदिवासी तरुणांना त्याचा लाभ होत आहे. आदिवासींमधील घुसखोरीला त्यांनी प्रखरपणे विरोध केला. तसेच धनगर समाजाचा आदिवासी समाजात समावेश करण्यासही त्यांचा विरोध होता. यासाठी प्रसंगी मंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली होती. आदिवासी विकास परिषदेच्या माध्यमातून त्यांनी आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावले. आपल्या मंत्रीपदाच्या काळात त्यांनी आदिवासींसाठी वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना सुरू केल्या. त्यामुळे आदिवासी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांना ठाणे येथील कारागृहात फाशी देण्यात आली होती. मंत्री असताना पिचड यांच्या पुढाकाराने ठाणे कारागृहात त्यांचे स्मारक उभारण्यात आले. भंडारदरा धरणाचा आद्य क्रांतीकारक वीर राघोजी भांगरे जलाशय असे नाव देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला, तो त्यांच्याच मागणीवरून. ९ ऑक्टोबर रोजी जलाशय नामकरण सोहळा त्यांच्याच उपस्थितीत भंडारदरा येथे संपन्न झाला. सार्वजनिक जीवनातील हा त्यांचा शेवटचा कार्यक्रम ठरला. १५ ऑक्टोबर रोजी त्यांना ब्रेनस्ट्रोक झाला. त्यानंतर त्यांचे दर्शन अकोलेकरांना झाले नाही. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी दीर्घकाळ अकोलेकरांना जाणवत राहील.

आजपासून विधिमंडळाचे विशेष अधिवेशन

शपथविधी होईल. पहिल्या दिवशी जास्तीत जास्त सदस्यांना शपथ देण्याचा प्रयत्न होणार आहे. तर दुसऱ्या उर्वरित सदस्यांना शपथ देऊन सदस्यांच्या शपथविधीची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. त्यासाठी आमदार कोणत्या भाषेतून आणि कुणाला साक्ष ठेवून शपथ घेणार याची माहिती विधानमंडळ प्रशासनाने मागवली आहे. साधारणतः सदस्य मराठी, हिंदी, संस्कृत आणि प्रादेशिक बोलीभाषेतून शपथ घेतात.

दरम्यान, या अधिवेशनात सभागृह नेते या नात्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा परिचय सभागृहाला करून देतील. ७ आणि ८ डिसेंबर अशा दोन दिवसात आमदारांचा शपथविधी पार पडल्यानंतर तिसऱ्या दिवशी म्हणजे ९ डिसेंबरला विधानसभा अध्यक्ष निवडला जाईल. या पदासाठी अगोदर निवडणूक कार्यक्रम घोषित केला जाईल. विधानसभा अध्यक्ष निवडीनंतर विधिमंडळाच्या संयुक्त बैठकीत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे अभिभाषण होईल.आपल्या अभिभाषणातून राज्यपाल नव्या सरकारचे अभिनंदन करून सरकारला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतील. दरम्यान विधान परिषदेची बैठक ९ डिसेंबर रोजी दुपारी चार वाजता आयोजित करण्यात आल्याची माहिती विधानमंडळ सचिवालयाने दिली आहे.

कोळंबकर हंगामी अध्यक्ष

- *अधिवेशनासाठी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून भाजपचे ज्येष्ठ आमदार कालीदास कोळंबकर यांची निवड करण्यात अली आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी कोळंबकर यांना हंगामी अध्यक्षपदाची शपथ दिली. २०१४ मध्येही कोळंबकर यांनी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. पंधराव्या विधानसभेत कोळंबकर हे सर्वात ज्येष्ठ सदस्य आहेत.*

अध्यक्षपदासाठी नार्वेकर, मुनगंटीवार, पाटील चर्चेत

- *पंधराव्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित आमदारांना शपथ देण्यासाठी आज, शनिवारपासून सुरु होणाऱ्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे ९ डिसेंबरला विधानसभा अध्यक्षाची निवड केली जाणार आहे. महायुतीत विधानसभा अध्यक्षपद हे भाजपकडे राहणार असल्याने या पदासाठी विधानसभेचे माजी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे नाव आघाडीवर आहे. याशिवाय ज्येष्ठ सदस्य म्हणून माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांतदादा पाटील यांच्याही नावाची चर्चा आहे.*

महायुतीच्या नेत्यांची आज मंत्रिमंडळासाठी बैठक

कठोर निकष लावणार असल्याचं देखील सांगण्यात येत आहे.

एकनाथ शिंदे कठोर निकष लावून मंत्रिपदाचा निर्णय घेणार असल्याचे म्हटले जात आहे. पक्ष संघटना वाढवणारे आणि जे पात्र असतील त्यांनाच मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार आहे. ज्येष्ठतेच्या मुद्यावर मंत्रिपद दिलं जाणार नाही, अशीही माहिती समोर आली आहे.

सेनेच्या तिघांना डच्चू?

- *यंदाच्या मंत्रिमंडळातून शिवसेनेच्या तीन विद्यमान मंत्र्यांचा पत्ता कट होणार आहे. सूत्रांच्या माहितीनूसार यामध्ये दीपक केसरकर, अब्दुल सत्तार आणि तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळण्याची शक्यता आहे.*

जिल्ह्यातील बहुतांश भागात पहाटेच बरसला अवकाळी

पारनेर : भाळवणी १७.५, पळशी १५, श्रीगोंदे : मांडवगण-०८, कर्जत : कोंभळी ३, शेवगाव : शेवगाव ०.८, भातकुडगाव ०.८, बोधेगाव २.३, चापडगाव २.३, ढोरजळगाव ३.५, एरंडगाव ६.८, दहिगावने ५.३, मुंगी ७.३. पाथर्डी : पाथर्डी २.५, माणिकदौंडी ९.५, टाकळी १, कोरडगाव ४.५, करंजी ४.८, मिरी १०. नेवासा :नेवासा खुर्द ४.५, नेवासा बुद्रुक ८.५, सलाबतपूर ६.८, कुकाणा ०.८, चांदा ९, घोडेगाव ९, सोनई ८.८, वडाळा ४.५, प्रवरासंगम ४.३, देवगड १.५. राहुरी : राहुरी १४.३, सात्रळ ३४.५, ताहराबाद १२, देवळाली १०.८, टाकळीमियॉ १४.३, ब्राह्मणी ७, वांबोरी ६.३, बारागाव नांदूर १९. संगमनेर : संगमनेर ८, धांदरफळ १०, आश्वी २०.५, शिबलापूर २०.५, तळेगाव १९.५, समनापूर ३४.८, डोळसणे १३.३. साकूर १३.३, पिंपळणे १६.८, अकोले : अकोले १०, वीरगाव ५.५, समशेरपूर ३, साकेवाडी ०.३, राजुर १.३, शेंडी १.३, कोतूळ १.५, ब्राह्मणवाडा ०.३, वाकी ०.८, कोपरगाव : कोपरगाव २९, रवांदे १२.३, सुरेगाव १२.३, दहिगाव १६.५, पोहेगाव १३.३, कोकमठाण २.३, श्रीरामपूर : श्रीरामपूर ६.५, बेलापूर ११.८, टाकळीभान ३.५, उंदिरगाव १६.३, कारेगाव ९.५, राहाता : राहाता १६, शिर्डी ७, लोणी १०.८, बाभळेश्वर १६, पुणतांबा १९.३, अस्तगाव १४ मिमी पावसाची नोंद झाली.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लवकरच

विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाची सूत्र घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी सरकारी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीवर भाष्य केले. विधानसभेत मिळलेल्या मोठ्या यशामुळे देवेंद्र फडणवीस यांनी पुढील निवडणुकांची तयारी केली जात असल्याचे संकेत दिले.

ईव्हीएमवर होणाऱ्या टीकेवर बोलताना फडणवीस म्हणाले की, ईव्हीएमवर बोलण्यापेक्षा विरोधकांनी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. एकाच दिवशी झारखंड आणि महाराष्ट्रात निवडणूक होते. ते झारखंडमध्ये जिंकतात तेव्हा ईव्हीएम चांगले असल्याचे म्हटले जाते. परंतु महाराष्ट्रात पराभव झाला तर ईव्हीएमचा घोळ असल्याचे म्हटले जाते.

सेनेसमोर तीन पर्याय?

विचार सुरू आहे. शिवसेनेला ३ खात्यांच्या पर्यांयांपैकी १ पर्याय निवडावा लागणार आहे. मात्र, गृहखात्याइतकेच महत्वाचे, तोडीस तोड खाते मिळवण्याकरिता शिवसेना आग्रही आहे. मुख्यमंत्री पदावरून उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्याने एकनाथ शिंदे गृहखात्यासाठी आग्रही आहेत. मात्र, भाजप देखील गृह खातं सोडायला तयार नाही.

दरम्यान, मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी गृहखात्यावर स्पष्टपणे भाष्य केलं आहे. गृहखातं, महसूल या खात्यांना थोडं महत्त्व असतं. आमच्या महायुतीत तीन पक्ष आहेत. या तिन्ही पक्षांचा योग्य तो सन्मान देण्यात आला आहे, असं फडणवीस यांनी सांगितलं. तसेच गृहखातं तुमच्याकडेच असेल का? या प्रश्नावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी स्मीतहास्य केलं आणि याबाबत जेव्हा निर्णय होईल तेव्हा मी तुम्हाला सांगेन, असं उत्तर त्यांनी दिलं. त्यामुळे, गृहखात्याचा सस्पेन्स कायम आहे.

शिवसेनेत सत्तासहभागाबाबत दोन विचार

मुख्यमंत्री म्हणाले, प्रत्यक्ष भेट होताच मार्ग निघाला

मुंबई – शिंदेंनी सरकारमध्ये न जाता समन्वय समितीचे प्रमुख पद घ्यावे आणि महायुतीचा कारभार व्यवस्थित हाकण्यावर देखरेख करावी, असा सल्ला काही नेत्यांनी त्यांना दिला होता. मात्र जेव्हा माझी आणि त्यांची भेट झाली, तेव्हा त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास होकार दिला, असा खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. शिवसेनेत सरकारमधील सहभागावरून दोन विचारप्रवाह होते, असे त्यांनी अप्रत्यक्षपणे सांगितले.

महायुतीला प्रचंड असे बहुमत मिळाल्यानंतरही सरकारचा शपथविधी होण्यासाठी तब्बल १२ दिवस लागले. सुरुवातीला शिवसेनेचे (शिंदे) नेते एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपदासाठी आग्रही होते, असे चित्र दिसत होते. त्यानंतर गृहमंत्रीपदावरून रस्सीखेच सुरू झाली. त्यातच माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आधी साताऱ्यातील दरे गावात गेले आणि नंतर ते आजारी पडल्यामुळे शपथविधीचे घोडे अडले. मग भाजपाचे प्रदेशाध्यक्ष यांनी परस्पर ५ डिसेंबरचा शपथविधीचा मुहूर्त एक्स वर पोस्ट केल्यामुळे महायुतीमधील घटक पक्षाच्या नेत्यांमध्ये समन्वय नसल्याची चर्चा झाली. उपमुख्यमंत्रीपद घेण्यास एकनाथ शिंदे कसे तयार झाले, याची गोष्ट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीतून सांगितली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निकालानंतर महायुतीच्या पहिल्याच बैठकीत एकनाथ शिंदे यांनी भाजपाचा मुख्यमंत्री व्हावा, यासाठी समर्थन दिले होते. मात्र त्यानंतर शिंदेंनी सरकारमध्ये न जाता समन्वय समितीचे प्रमुख पद घ्यावे आणि महायुतीचा कारभार व्यवस्थित हाकण्यावर देखरेख करावी, असा सल्ला काही शिवसेनेच्या नेत्यांनी दिला. शिवसेनेच्या काही नेत्यांना मुख्यमंत्री आपल्याच पक्षाचा व्हावा, असे वाटत होते. माझे आणि एकनाथ शिंदेंचे वैयक्तिक संबंध चांगले आहेत. जेव्हा माझी आणि त्यांची भेट झाली, तेव्हा त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास होकार दिला होता, असे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीत सांगितले.

२०१९ सालीही भाजपाचे १०० हून अधिक आमदार निवडून आले होते. तरीही २०२२ साली एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री पद का दिले होते? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारला गेला. त्यावर ते म्हणाले, त्यावेळी शिंदेंनी उठाव करत मविआतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. मला वाटते त्यावेळी शिंदेंनी मोठी जोखीम उचलली होती. कारण असे निर्णय कधी कधी तुमचे राजकारण संपवू शकतात. त्यामुळेच मीच भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना प्रस्ताव देऊन शिंदेंना मुख्यमंत्री करावे. कारण शिंदेंना मुख्यमंत्री केले तर त्यांच्याबरोबर आलेल्या लोकांना आत्मविश्वास मिळेल. त्यामुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांना त्यावेळी सर्व काही सांगता आले नाही.

चुकीचा संदेश गेला असता

- २०२४च्या विधानसभेत भाजपाचे संख्याबळ प्रचंड असल्यामुळे आम्हाला शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देता आले नाही. कारण असा निर्णय घेतला असता तर देशभरातील कार्यकर्त्यांमध्ये एक चुकीचा संदेश गेला असता, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

बीएडचा कालावधी पुन्हा एक वर्षाचा

पुणे(प्रतिनिधी)– बॅचलर ऑफ एज्युकेशन म्हणजेच बीएडचा कालावधी, स्वरूप आणि अभ्यासक्रम २०२६-२७ पासून बदलणार आहे. हा अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत हा बदल होत आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून बीएडचे स्वरूप, कालावधी आणि अभ्यासक्रम बदलणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत प्रस्तावित बदलामध्ये दहा वर्षांनंतर बीएड् अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार आहे.

शिक्षक पात्रता चाचणीचे (टीईटी) नियम आणि निकषांमध्येही बदल केले जाणार आहेत. हे बदल २०२६-२७ मध्ये चार वर्षांच्या एकात्मिक पदवी उमेदवारांच्या बॅचच्या आधी केले जातील. शैक्षणिक धोरणांतर्गत, पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि माध्यमिक स्तर या चार भागांत शिक्षक तयार केले जातील. पदवीपूर्व अभ्यासक्रमातील बदलांमुळे विविध बीएड कार्यक्रम पुन्हा सुरू केले जात आहेत. बीएड महाविद्यालयांसाठी नवीन बदलांची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार आहे. यामध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. चार वर्षांचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना एका वर्षात बीएडसाठी प्रवेश घेता येईल.

तीन वर्षांच्या पदवीधर विद्यार्थ्यांना दोन वर्षांतील बीएडसाठी प्रवेश मिळेल. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळेल. चार वर्षांचे एकात्मिक बीएड आणि दोन वर्षांचे बीएड शिकणारे विद्यार्थी एमएडच्या पदवीसाठी प्रवेश घेऊ शकतील.

शैक्षणिक धोरणांतर्गत पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि माध्यमिक स्तर या चार भागांनुसार शिक्षक तयार केले जातील. पदवीपूर्व अभ्यासक्रमातील बदलांमुळे विविध बीएड कार्यक्रम पुन्हा सुरू केले जाणार असल्याचे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

कसा आहे दिव्यांगांसाठी विशेष बीएड अभ्यासक्रम?

विशेष बीएड अभ्यासक्रमामध्ये शिक्षकांना दिव्यांग मुलांना शिकवण्यासाठीचे प्रशिक्षण दिले जाते. दिव्यांग मुलांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये श्रवण, वाक्, दृष्टिदोष, मानसिक अपंगत्व इत्यादी अपंगांसाठी अभ्यासक्रम चालविला जातो. ज्या संस्थांना चार वर्षांचा एकात्मिक बीएड विशेष शिक्षण अभ्यासक्रम सुरू करायचा असेल, त्यापुढील शैक्षणिक सत्रासाठी अर्ज करू शकणार आहेत.

चार नव्या अभ्यासक्रमांचा समावेश

बीए बीएड, बीएसस्सी बीएड आणि बीकॉम बीएडची पहिली बॅच २०२३ मध्ये सुरू झाली. २०२५ पासून त्यात शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, योगशिक्षण आणि संस्कृत शिक्षण हे चार नवीन स्पेशलायझेशन अभ्यासक्रम जोडले जातील.

बारावीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यात प्रवेश घेता येणार आहे. बीएड महाविद्यालयांसाठी २०२५ पासून नवीन बदलांची अधिसूचना जारी केली जाणार आहे. यामध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. शिक्षक पात्रता चाचणीच्या नियम आणि निकषांमध्येदेखील बदल केले जाणार आहेत. हे बदल २०२७ मध्ये चार वर्षाच्या एकात्मिक पदवी उमेदवारांच्या बॅचच्या आधी केले जातील. याची अधिसूचना लवकरच जारी केली जाईलें राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेचे (एनसीटीई) अध्यक्ष प्रा. पंकज अरोरा यांनी ही माहिती दिली.

तालुका कृषी विभागाच्यावतीने जागतिक मृदा आरोग्य दिन साजरा

राहाता (तालुका प्रतिनिधी)– तालुका कृषी अधिकारी राहाता व कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने मा नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदृशनाखाली जळगाव येथे जागतिक मृदा आरोग्य दिन निमित्त किसान गोष्टी व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ शैलेश देशमुख व शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे उपस्थित होते. यावेळी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. तसेच उपस्थित शेतकरी बांधवांना माती नमुना घेण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी रासायनिक खते व कीटकनाशके यांचे जमिनीवर होणारे विपरीत परिणाम, जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी मातीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्याचे उपाययोजना, जमिनीमध्ये सेंद्रिय खतांच्या वापराचे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे यांनी माती परीक्षण करण्यासाठी माती नमुना काढण्याची पद्धती, माती परीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी राहाता आबासाहेब भोरे यांनी शेती करताना जमिनीचे आरोग्य जपणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. तसेच शेतकरी बांधवांना कृषी विभागाच्या विविध मोहिमा व योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी मधुकर कदम, कृषी सहाय्यक राजेश पन्हे, आत्माचे किशोर कडू, राजदत्त गोरे, शेतकरी गंगाधर चौधरी, भाऊसाहेब चौधरी, संपतराव चौधरी, उपसरपंच दिलीप चौधरी, विजय चौधरी, मच्छिंद्र चौधरी, शंकर चौधरी, अण्णासाहेब चौधरी, महेंद्र चौधरी, सुरेश वारुळे, रंगनाथ चौधरी व इतर शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक मंडल कृषी अधिकारी मधुकर कदम यांनी केले तर सूत्रसंचालन कृषी सहाय्यक राजेश पन्हे यांनी केले. मच्छिंद्र चौधरी यांनी आभार मानले.

अजित पवारांनी घेतली पराभूत उमेदवारांची बैठक

मुंबई (प्रतिनिधी)– राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांची शुक्रवारी बैठक घेतली. पवार यांच्या देवगिरी या शासकीय बंगल्यावर पार पडलेल्या या बैठकीत पराभवांच्या कारणांची चर्चा झाल्याचे समजते.

बैठकीला यशवंत माने, देवेंद्र भुयार, बाळासाहेब आजबे, सुनील टिंगरे, अतुल बेनके आणि राजेश पाटील उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीत मित्र पक्षांनी मदत न केल्याची त्यातही भाजपच्या भूमिकेबाबत या पराभूत उमेदवारांनी अजित पवारांकडे तक्रार केल्याचे समजते. मी सर्व पराभूत उमेदवारांच्या पाठीशी असल्याचे सांगत अजित पवार यांनी पराभूत उमेदवारांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. पराभव झाला असला तरी मतदारसंघात पूर्ण ताकदीनीशी काम करा. पुढील निवडणुकीत आपल्याला कसे जिंकून येता येईल यासंदर्भात काम करण्याच्या सूचनाही अजित पवारांनी या उमेदवारांना दिल्या आहेत.

चितळी सेवा सोसायटीच्या संचालकपदी सागर कातोरे बिनविरोध

चितळी (वार्ताहर)–राहाता तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाची असलेल्या चितळी सेवा सोसायटीच्या संचालकपदी तरुण सामाजिक कार्यकर्ते सागर कातोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या चितळी सेवा सोसायटीच्या मासिक बैठकीमध्ये सागर कातोरे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष बाळासाहेब साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवडीसाठी संस्थेचे ज्येष्ठ संचालक रेवणनाथ वाघ यांनी सागर कातोरे यांच्या नावाची सूचना केली तर अनुमोदन शिवाजी वाघ यांनी दिले. सचिव बाबासाहेब गाढवे यांनी यावेळी निवडीसाठी कामकाज पाहिले.

येथील शेतकरी वर्गाच्या हितासाठी अग्रेसर असलेल्या या सेवा सोसायटीचा आलेख उंचावण्यासाठी आपण कायम बांधील राहू, अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित संचालक सागर कातोरे यांनी दिली. याप्रसंगी ज्येष्ठ संचालक रेवणनाथ वाघ, ॲड. अशोकराव वाघ, रामराव वाघ, दिगंबर वाघ, शिवाजी वाघ, रंगनाथ लांडे, बाळासाहेब साळुंके, दीपक वाघ, संदीप वाघ, श्रीरंग कातोरे, रुपेश गायकवाड, संभाजी तनपुरे, दिलीप वाघ, अरुण कातोरे, सतीश कोते, नवनाथ वाघ, बालू शेख, रज्जाक शेख आदी उपस्थित होते. या निवडीबद्दल ना. राधाकृष्ण विखे पाटील व आ. आशुतोष काळे यांनी अभिनंदन केले आहे.